The Malkapur Urban Co-op. Bank Ltd. H.O. Malkapur
"Dhanashri", Malkapur - 443 101, District : Buldana (M.S.)
Tel. Fax. : (07267) 222086, 222886, 223804
Under Liquidation
॥ अर्थःमुले क्रिया सिध्दि ॥

## स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव विक्री सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| **मालमत्ता पाहणी दिनांक**: कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ५.०० (पूर्व परवानगीसह) | | | |
| **निविदा/ प्रस्ताव उघडण्याची तारीख:** २६/१२/२०२४ **निविदा/ प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** २८/०१/२०२५, सायंकाळी ०५.०० वाजेपुर्वी | | | |
| **निविदा/ प्रस्ताव दाखल करण्याचे ठिकाण** :दि मलकपूर अर्बन को ऑप बँक लि.मलकापूर (अवसायनात),मुख्यालय,मलकापूर,जि. बुलडाणा आणि शाखा जवाहर कॉलोनी, छत्रपती संभाजीनगर | | | |
| **लिलावाची तारीख** | २९/०१/२०२५ | **लिलावाची वेळ** : सकाळी ११.०० | |
| **लिलावाचे ठिकाण** | दि मलकापूर अर्बन को ऑप बँक लि. मलकापूर (अवसायनात), शाखा जवाहर कॉलोनी, बादशाह कॉम्प्लेक्स, पहिला मजला, पुंडलिक नगर रोड, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर | | |
| **अनु.क्र.** | **मालमत्तेचे सविस्तर वर्णन** | **राखीव किंमत** | **बयाना रक्कम** |
| 1 | सर्व भाग, पोटभाग, हिश्यासाहित शेत जमीन गट क्र. ११/२, क्षेत्रफळ ५ एकर १२ आर (२ हेक्टर १२ आर), मौजे जांभई, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, ज्याची चातुसिमा खालील प्रमाणे;<br>**पूर्वेस :** राळेगाव आणि शिव **पश्चिमेस:** पुंडलिक मुरमेची जमीन<br>**उत्तरेस:** जांभई सिल्लोड रोड **दक्षिणेस:** नाला | ४७,४०,६२५/- | ४,७४,०६३/- |
| | **देय्य रक्कम** | ११,२३,२७९/- अधिक व्याज, सरचार्ज, खर्चासहित | |
| | **कर्जदाराचे नाव** –मे. कृष्णा इलेक्ट्रोनिक्स & फर्निचर, प्रोप्रा सौ रेणुका कौतिकराव मुरमे | | |

## जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

१. निविदा हि बयाना रकमेसहित बंद पाकिटात दि मलकापूर अर्बन को ऑप बँक लि मलकापूर या नावाने जमा करावे

२. राखीव किमतीपेक्षा कमी रक्कम आणि / किंवा कमी बयाना रकमेची कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही

३. जाहीर लिलाव सुचनापत्रात नमूद केल्या प्रमाणे बयाना रकमेचा डिमांड ड्राफ्ट/ पे ओर्डर लिलावात सहभागी होण्यासाठी वसुली अधिकाऱ्याकडे जमा केले पाहिजे. डिमांड ड्राफ्ट / पे ओर्डर, ' **दि मलकापूर अर्बन को ऑप बँक लि'** या नावाने काढलेला असावा.

४. देऊ केलेली किंमत हि गैरवाजवी रीतीने अतिशय कमी आहे असे वसुली व विक्री अधिकाऱ्यास वाटले किंवा इतर काही कारणावरून विक्री अधिकाऱ्यास सर्वात जास्त बोललेली बोली स्वीकारण्यास नकार देण्याची मोकळीक असेल.

५. लिलावाच्या वेळी बोलीची रक्कम रुपये १,००,०००/- च्या पटीत वाढवत नेली पाहिजे किंवा बोलीची पद्धत वसुली अधिकारी यांनी ठरवून दिल्यानुसार असेल. गरज भासल्यास वसुली अधिकारी सदर लिलाव जास्तीत जास्त सात दिवस तहकूब करू शकतात.

६. यशस्वी बोलीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्या बरोबर विक्री किमतीच्या १५ टक्के रक्कम (बयाना रकमेपोटी भरलेली रक्कम वगळून) लगेच भरावी लागेल.

७. खरेदीची उरलेली रक्कम आणि विक्री प्रमाणपत्रासाठी आवश्यक मुद्रांक शुल्क रकमेचा भरणा, विक्री तारखेपासून तीस दिवसांच्या आत यशस्वी बोलीदारास करावा लागेल.

८. यशस्वी बोलीदाराने वरील अट क्र. ७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत आवश्यक मुद्रांक शुल्क रकमेचा भरणा करण्यास कसूर केल्यास, विक्रीचा खर्च वगळून अनामत ठेवलेली रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल. सदर यशस्वी बोलीदाराचा भविष्यामध्ये त्या मालमत्तेवर किंवा ज्या रकमेस ती मालमत्ता विकण्यात येईल त्या रकमेवर कोणताही हक्क असणार नाही तसेच स्थावर मालमत्तेची करावयाची फेरविक्री, विहित केलेल्या रीतीने व विहित केलेल्या मुदतीसाठी नव्याने जाहीर लिलाव विक्री सूचना प्रसिद्ध केल्यानंतर करण्यात येईल.

९. अर्जदार बँक लिलावातील मालमत्ता लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असल्यास खरेदीसाठी/ बोली बोलू शकते / लिलावात भाग घेवू शकते. जर अर्जदार बँक यशस्वी बोलीदार असेल तर खरेदीची किंमत व येणे कर्जाची रक्कम यांची वाजवट करून येणे असलेल्या कर्जाची पूर्णपणे किंवा अंशतः परतफेड बाबत नोंद करण्यात येईल.

१०. लिलावात विकल्या गेलेल्या मालमत्तेवर मालकी हक्क असणाऱ्या किंवा हितसंबंध धारण करणाऱ्या व्यक्तीस, विक्री तारखेपासून तीस दिवसाच्या आत, येणे कर्ज रक्कम व त्यावरील येणे व्याज खर्च, सरचार्ज व यशस्वी खरेदीदारास देणेसाठी खरेदी रकमेच्या ५ टक्क्याइतकी रक्कम भरल्यास विक्री रद्द करणेसाठी अर्ज करता येईल.

११. विक्री तारखेपासून तीस दिवसाच्या आत वरील अट क्र. १० प्रमाणे रक्कम प्राप्त झाल्यास व अर्ज करण्यात आल्यास सदर विक्री रद्द करण्यात येईल आणि खरेदीदारास अनामत ठेवलेली खरेदीची किंमत व त्या रकमेवर शेकडा ५ टक्क्याइतकी रक्कम परत करण्यात येईल.

१२. विक्री केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांची मुदत संपल्यानंतर जिल्हा उप निबंधक यांची मान्यता मिळाल्यानंतर विक्री कायम करण्यात येईल. अशी विक्री कायम केल्यानंतर खरेदीदारास विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल.

१३. बँकेकडून विक्रीचे प्रमाणपत्र दिले जाताच विक्रीची पूर्तता होईल व कोणताही दावा बँक स्वीकारणार नाही.

१४. विक्री जसे आहे जेथे आहे जशी आहे तशी व माहित असलेल्या, नसलेल्या भारासह केली जात आहे. मालमत्तेवर प्रभावित होणाऱ्या मालकी (टायटल) शर्ती किंवा अन्य कोणत्याही वस्तुस्थितीस बँक जबाबदार राहणार नाही.

१५. कोणत्याही कारणास्तव, कोणतेही कारण न देता विक्री रद्द करण्याचे, तहकूब करण्याचे संपूर्ण अधिकार वसुली अधिकारी यांचे अधिकारात असतील, आणि असे रद्द केलेल्या निर्णयास बोलीदारास प्रश्न करता येणार नाही. अश्या परिस्थितीत बँकेने दाखल केलेला प्रस्ताव परत घेईल आणि बोलीदाराकडून बोली संदर्भात केलेली कोणतीही मागणी अथवा प्रतिनिधित्व बँकेमार्फत स्वीकारले जाणार नाही.

१६. कोणत्याही टप्प्यावर कोणतेही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचे, वसुली अधिकारी यांनी आपल्या अधिकारात, आपल्या निर्णयानुसार विक्रीच्या कोणत्याही शर्तीत बदल करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवलेले आहेत.

१७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम १०७ उपनियम (१३)(३) नुसार खरेदीदारास विक्री केलेल्या मालमत्तेचा ताबा विक्री कायम झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत कोणत्याही कारणासाठी देण्यात कसूर झाल्यास व खरेदीदाराने मागणी केल्यास जमा केलेल्या रकमेचा परतावा देण्यात येईल.

वरील अटी व शर्ती मी वाचून समजून घेऊन सही करीत आहे.

सही/-

वसुली अधिकारी

निविदाधारकांचे नाव/ सही

**दि मलकापूर अर्बन को ऑप बँक लि.मलकापूर**

दिनांक :-

(अवसायनात)